MHRG080002682014



## नियमीत दिवाणी दावा क्र.७०/२०१४ मधील
## निशाणी क्र.९४ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१० ने कैफियत सादर करण्यास झालेला विलंब माफ करुन, कैफियत नाही असा पारीत करण्यात आलेला आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

०२. प्रतिवादी अर्जात कथन करतो की, त्याला तारखेबाबत चुकभूल झाल्यामुळे मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यानंतर, कोरोना माहामारीमुळे न्यायालयीन कामकाज बंद असल्याने तारखांना हजर राहून कैफियत दाखल करता आली नाही. सबब, प्रतिवादी क्र.१० ने झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितलेली आहे.

०३. त्याउलट, वादींनी प्रस्तुत अर्जास हरकत नोंदवून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१० दि.१५/११/२०१४ रोजी न्यायालयात हजर झालेला आहे. परंतु त्याने विहीत मुदतीत कैफियत दाखल न केल्याने या न्यायालयाचे पुर्वपिठासिन अधिका-याने दि.३०/०१/२०१५ रोजी प्रतिवादीविरुध्द विना कैफियत दाव्याचे कामकाज पुढे चालविण्याचा आदेश पारित केला. त्यानंतर, प्रस्तुत प्रतिवादीने दि.२९/०३/२०२२ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितलेली आहे.

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादीला दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने

जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादीला जवळ-जवळ ७ वर्ष ४ महिने १४ दिवसांचा विलंब झालेला आहे. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक आहे. प्रतिवादीने त्याला तारखेंबाबत चुकभूल झाल्याचे व कोरोना माहामारीमुळे न्यायालयीन कामकाज बंद असल्याचे कारण अर्जामध्ये नमुद केलेले आहे. परंतु, प्रतिवादी क्र.१० ची कैफियत दाखल करण्याची मुदत कोरोना माहामारी सुरु होण्यापुर्वीच बराच कालावधी आधी संपलेली आहे. प्रतिवादी क्र.१० ला झालेला विलंब ७ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा आहे की जो अवाजवी आहे. त्यामुळे, अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक कारण नाही हे स्पष्ट होते. परंतु, प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता प्रतिवादी क्र.१० ला त्याची कैफियत दाखल करुन देण्याची परवानगी देणे न्यायोचित आहे. प्रतिवादीने संयुक्तीक कारण दिलेले नसल्यामुळे अर्जाचा खर्च त्याच्यावर ठेवणे उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:-

## :-आदेश-:

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज (निशाणी क्र.९४)रक्कम रु.७,०००/-च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम वादींना देण्यात यावी. |
| **२.** | खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.१० ला कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

**(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2022.07.11 17:58:45 +0530

दिनांकः ११/०७/२०२२
खालापूर.

**(पी.एम.माने)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खालापूर.